# Lokmat

## Samriddhi 2009 begins

**Date: 30-08-2009 | Edition: Goa | Page: 9 | Source: Bureau | Clip size (cm): W: 17 H: 9**

**Clip: 1 of 1**

# ‘समृद्धी २००९’चे उद्घाटन

**पणजी, दि. २९ (प्रतिनिधी)** : हडफडे येथील हॉटेल रिव्हीएरा दी गोवा येथे आज गोवा इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट आयोजित ‘समृद्धी २००९’ या राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन मुख्यमंत्री दिगंबर कामत यांच्या हस्ते झाले. या दोन दिवसीय परिषदेत ‘सामाजिक उद्योजकता’ हा विषय हाताळला जाईल. उद्घाटनानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत व्यवस्थापन क्षेत्रातील काही दिग्गजांनी या विषयावर प्रकाश पाडला. ‘सामाजिक उद्योजकता म्हणजे समाज व पर्यावरणाबरोबर आपल्या आर्थिक सुरक्षिततेलाही महत्त्व देऊन केलेला उद्योग’ असे आविष्कार इंडिया मायक्रो व्हेन्चर कॅपिटल फंडचे गुंतवणूक मंडळाचे अध्यक्ष अरुण डीयाज म्हणाले. अशोका इनोव्हेटर्सच्या संचालिका सोहिनी भट्टाचार्य यांचे मत असे होते, की आपण सामाजिक उद्योजकतेला आपल्या विचारसरणीनुसार वेगवेगळ्या परिभाषा देऊ शकतो व आपल्या फायद्याबरोबरच आपण समाजाबद्दलही विचार केला तर ‘व्यावसायिक उद्योजकता’ व ‘सामाजिक उद्योजकता’ या दोन्ही संकल्पनांमध्ये जास्त अंतर राहणार नाही. याव्यतिरिक्त आयआयएएम बंगळूरचे डीन डॉ. त्रिलोचन शास्त्री, कॉस्मोस इग्नाईट, सोल्युशनचे अमित चुग, अशोक युथ व्हेंचरचे सहसंचालक विपीन थेक्केकलथील, परिचयचे सह संस्थापक विकास शर्मा, वात्सल्य हेल्थ केअरचे सहसंस्थापक डॉ. अश्विन नाईक, अरविंद सिंग अशा काही दिग्गजांची उपस्थिती व्यवस्थापन क्षेत्रातील मुलांना वरदान ठरेल.




‘समृद्धी २००९’ या राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी दीपप्रज्ज्वलन करताना पीटर डिलिमा. बाजूला मुख्यमंत्री दिगंबर कामत.